नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०३/०४/२०२४ (बुधवार) सायंकाळ

---

### पोस्टे रामटेक हद्दीतील मौजा कांद्री माईन येथे अवैधरित्या मोहफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. ०२/०४/२०२४ रोजी १५.०० वा. १५.४५ वा. चे दरम्यान मौजा कांद्री माईन येथे मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– वासू नारायण कठौते वय ४५ वर्ष रा. कांद्री माईन ता. रामटेक** हा मोहाफुलाची गावठी दारू गाळतांनी मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) मोहाफुल रसायण ९० लिटर प्रत्येकी ५०/– रु प्रती लिटर असा एकुण किंमती ४५००/– रु. २) रबरी टयुबमध्ये ६० लिटर मोहाफुल गावठी दारु किमत ५० रु प्रमाणे किमत ३०००/–रु. ३) गरम मोहाफुल रसायण २० लिटर ५०/–रु प्रमाणे १०००/–रु ४) मोहाफुल हातभटटी गाळण्याचे साहीत्य ड्रम, साचा, नळी व ईतर साहीत्य किंमती ३२००/–रु असा एकूण ११,७००/–रु चा मुद्देमाल मिळून आल्याने कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे रामटेक येथे कलम ६५ (एफ), (सी) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, सफौ संजय पायक, पोलीस अंमलदार रूपेश राठोड यांनी पार पाडली.

# फसवणूक गुन्हयातील फरार आरोपी गजाआड

मा. पोलीस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण यांचे आदेशान्वये संपुर्ण जिल्हयात पाहिजे असलेले आरोपी यांची शोध मोहीम सुरू असतांना मार्गदर्शनात दिनांक ०२/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर उपविभागात पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोस्टे बुट्टीबोरी येथील अप. क्र. १९३/१९ कलम ४०९, ४२०, ३४ भादंवि. सहकलम ३ MPID मधील पाहिजे असलेला **आरोपी नामे– सुनिल काशिराम येरमे, वय ४० वर्ष रा. वार्ड नं. ०२ बापूपेट चंद्रपुर** हा चंद्रपूर जिल्हयातील बाबुपेठ परीसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर आरोपीस ताब्यात घेतले. सदर आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यावरून सदर गुन्हयात आरोपीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीची वैदयकीय तपासणी करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे बोरी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, ASI सुरज परमार, HC दिनेश आधापुरे, PC राकेश तालेवार, PC आशुतोष लांजेवार, PN सतीश राठोड यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**